**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : ०५/०४/२०१७

प्रति,
मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र. १ सोमवार दि. १०/०४/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका

**सोमवार दिनांक - १०/०४/२०१७ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| १ | कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ डॉक्टरांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री, फिटर यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०१५-२०१६ ई -निविदा क्र.१४८२ या निविदेच्या मंजुरीबाबत दौंड रोड ते आव्हाड विट भटटी ते तावरे घर ते दरेकर घरापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुने रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक टाकणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक व ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | अर्जदार श्री. महादेव मारूती कोलते , रा. बोल्हेगाव रोड नागापुर,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७३, बील क्रमांक ४४२ चे मालमत्ताधारक नळ कनेक्शन नाही पाणीपटटी सन २०१३-२०१४ ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अर्जदार श्री.विलास चंद्रकांत काळभोर, रा. बोल्हेगाव रोड नागापुर,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७३, बील क्रमांक ७३/१ चे मालमत्ताधारक नळ कनेक्शन नाही पाणीपटटी सन २०१५-२०१६ ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | वॉर्ड क्र.७२ अ,बील क्र.४६० ते ४६७ प्रभाग समिती क्र१ नागापुर विभागामध्ये एम.आय.डी.सी.येथील एल व एम ब्लॉक मध्ये मालमत्ता धारक श्री.वाबळे रोहिदास गबाजी व इतर ७ जण यांना घरपट्टी आकारणी झालेल्या मालमत्ता धारकांची घरपट्टी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ७ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षा करिता अहमदनगर महानगरपालिका दवाखन्यासाठी व रक्तपेढीसाठी लागणारी सर्व प्रकारची औषधे,रसायने,वैद्यकिय साहित्य व उपकरणे इ.पुरवठा वार्षिक निविदा दर मंजूरीबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ८ | अहमदनगर महानगरपालिकेचे स्थानिक निधी लेखापरिक्षण सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ चा लेखा परिक्षण अहवाल मा.स्थायी समितीपुढे सादर करणे बाबत. |

सही /-
प्र. नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- १ सोमवार दिनांक १०/०४/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ डॉक्टरांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग
**संदर्भ : -** मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीकागृह ८९३ दिनांक १०/०१/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की ,मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा. क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह ८९३ दि.१०/०१/२०१७ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टारांची आवश्यकता नेहमी भासते.आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञांचे पद मंजुर नसल्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१ दि.२५/०९/२०१३ अन्वये शहरातील इच्छुक बालरोगतज्ञांची इमर्जन्सी कॉल करीता रु १५०/- प्रति रुग्ण/प्रति व्हीजीट पॅनलशीपवर नेमणुक करणेचा ठराव पारीत करण्यात आला त्या अनुषंगाने जा.क्र.आस्था. ५२९७ दि. २५/१०/२०१३ अन्वये खालील तक्त्यातील अ.क्र. १ ते १२ बालरोगतज्ञ डॉक्टारांची दिनांक ०१/११/२०१३ पासुन तीन वर्षाकरीता नेमणुक करण्यात आली व आस्थापना जा.क्र.आस्थापना ४२२७ दि. ०४ / १० / २०१६ अन्वये अ.क्र. १३ व १४ मधील बालरोग तज्ञ डॉक्टारांचे सदर पॅनलमध्ये समाविष्ट करण्यात आले होते.

| अ.क्र. | बालरोग तज्ञांचे नांव | अ.क्र. | बालरोग तज्ञांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | डॉ. श्री. सुचीत तांबोळी | ८ | डॉ. श्री. सुभाष फिरोदिया |
| २ | डॉ. श्री. अनिरुध्द गिते | ९ | डॉ. श्री. दिपक करपे |
| ३ | डॉ. श्री. जयदीप देशमुख | १० | डॉ. श्री. रामदास बांगर |
| ४ | डॉ. श्री. अमोल सिताराम तोडमल | ११ | डॉ. श्री. प्रताप पटारे |
| ५ | डॉ. श्री.अनंतकुमार किशोर भांगे | १२ | डॉ. श्रीमती शेहनाज आय्युब |
| ६ | डॉ. श्री. सचिन सुखदेव पालवे | १३ | डॉ. श्री. राहुल छत्रपती बोरुडे |
| ७ | डॉ.श्री.सागर रामनाथ वाघ | १४ | डॉ.सौ.वैभवी पी.वंजारे |

वरील सर्व १४ बालरोगतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलशिपवरील नेमणुकीचा कालावधी दि. ३०/१०/२०१६ रोजी संपली आहे. मात्र अत्यावश्यक सेवा करीता त्यांना सध्या इमर्जन्सी कॉल करीता दवाखान्यामध्ये बोलावण्यात येत आहे. तरी कै.बा.दे.दवाखान्यामध्ये जन्म घेणा-या नवजात बालकांच्या इमर्जन्सी कॉल करीता रु. १५०/- प्रति पेंशट / प्रति व्हीजीट या प्रमाणे फी अदा करुन वरील १४ बालरोगतज्ञांचे दिनांक ०१/११/२०१६

पासुन पुढील तीन वर्षाकरीता पॅनलशिपवर बालरोगतज्ञ डॉक्टारांच्या पॅनलला मुदतवाढ देणे बाबत." नमुद करुन सुचित केलेले आहे.

"सदर प्रस्तावावर मा.वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी " 'अ' प्रस्तावित बाबत मुदतवाढ देणेकामी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे उचित वाटते." असे नमुद करुन अभिप्राय दिलेला आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह ३७४ दि.११/०७/२०१३ व जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह ४५४ दि.५/०८/२०१३ व जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह १०३३ दिनांक ३/०२/२०१६ व जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह १२१ दिनांक ११/०५/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात बालरोग तज्ञ डॉक्टरांची पॅनलशिप व्हिजीट बेसीसवर तीन वर्षा करीता करारबध्द नियुक्ती बाबत सुचित करण्यात आलेले होते. त्यानुषंगाने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेले होता.सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१ दिनांक २५/०९/२०१३ व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ६८ दिनांक १०/०८/२०१६ अन्वये ठराव पारीत करुन मान्यता दिल्यानुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात बालरोग तज्ञ डॉक्टर म्हणुन जा.क्र.आस्था. ५२९८ दिनांक २५/१०/२०१३ अन्वये व १) डॉ. श्री. सुचित तांबोळी व २) डॉ. श्री. अनिरुध्द गिते यांची दिनांक ०२/०७/२०१३ पासुन तीन वर्षा करीता व जा.क्र.आस्था. ५२९७ दिनांक २५/१०/२०१३ अन्वये जयदिप देशमुख व इतर ०९ यांची दिनांक ०१/११/२०१३ पासुन तीन वर्षा करीता तसेच जा.क्र.आस्था. ४२२७ दिनांक ०४/१०/२०१६ अन्वये डॉ. श्री. राहुल छत्रपती बोरुडे व डॉ. सौ. वैभवी पी वंजारे यांची इमर्जन्सी कॉल करीता रु. १५०/- प्रति पेशंट / प्रति व्हीजीट फी यावर पॅनलशिप व्हिजीट बेसीसवर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यामध्ये पान नं. २२ वरील विवरण पत्र क्रमांक २९ मध्ये अनु. क्र. ६ नुसार रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी बालरोग तज्ञ पद मंजुर पद संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ. क्रं. | पदाचा तपशिल | मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|
| ६ | बालरोग तज्ञ | ------ | १ | १ |
| एकुण | | ------ | १ | १ |

मा. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय,क्रमांक- अमपा- २०१२/प्र.क्र.३०१ (भाग-२)/नवि-२५,मंत्रालय,मुंबई३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापने वरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्यसेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या बालरोग यापदांवर नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे संदर्भिय जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह ८९३ दिनांक १०/०१/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात बालरोग तज्ञ डॉक्टर म्हणून ऑनकॉल पॅनलशिप बेसीसवर १) डॉ. श्री. सुचीत तांबोळी २) डॉ. श्री. अनिरुध्द गिते ३) डॉ. श्री. जयदीप देशमुख ४) डॉ. श्री. अमोल सिताराम तोडमल ५) डॉ. श्री.अनंतकुमार किशोर भांगे ६) डॉ. श्री. सचिन सुखदेव पालवे ७) डॉ.श्री.सागर रामनाथ वाघ ८) डॉ. श्री. सुभाष फिरोदिया ९) डॉ. श्री. दिपक करपे १०) डॉ. श्री. रामदास बांगर ११) डॉ. श्री. प्रताप पटारे १२) डॉ. श्रीमती शेहनाज आय्युब १३) डॉ. श्री. राहुल छत्रपती बोरुडे १४) डॉ.सौ.वैभवी पी.वंजारे यांची इमर्जन्सी कॉल करीता १५०/- प्रति पेशंट / प्रति व्हीजीट या प्रमाणे फी अदा करुन दिनांक ०१/११/२०१६ पासुन पुढील तीन वर्षा करीता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत निर्णय कामी सदरचा प्रस्ताव हा मा. स्थायी समितीकडे पुर्व मंजुरी मिळणे करीता पाठवावा लागेल.

तरी याबाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पुर्व मंजुरी मिळणे करीता पाठविणेसाठी निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र मनपा अधिकनयम २०१२ चे कलम ५३ अन्वये कार्यवाही करणेस हरकत नाही.

ठरावाच्या प्रती सोबत नाही.वरील अ प्रमाणे मा.स्थायी समिती मंजूरीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त सा.यांची स्वाक्षरी.

यावर सोबतच्या टिपणी प्रमाणे निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ डॉक्टरांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती बाबत विषय आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आकृती बंधात बालरोग तज्ञांची किती पदे मंजूर आहेत.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- एक पद मंजूर आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ही जागा कायमस्वरूपी का भरत नाही.आकृतीबंध मा.शासनाने मंजूर केलेला आहे.हे डॉक्टर कायम स्वरूपी दवाखान्यात उपलब्ध असता का?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- हे १२ डॉक्टर असून आपण यांना ऑनकॉल बेसवर नियुक्ती दिलेली आहे.आपल्याला जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा आपण त्यांना कॉल करतो.जे डॉक्टर उपलब्ध होतील ते व्हीजीट साठी येतात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-आकृतीबंधामध्ये पद मंजूर आहे.मा.शासनाने मंजूरी दिलेली आहे.हे पद तात्काळ भरा.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- आस्थापना खर्च जास्त असल्याने सध्या पदे आपल्याला भरता येत नाही.

मा.बाळासाहेब बोराटे :- जर आकृती बंधाप्रमाणे जागा भरल्यास आस्थापना खर्च कमी होणार आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- कायम स्वरूपी पदे भरल्यास आपल्याला इतर सुविधा देता येतील.नविन युनिट चालू करता येईल.डॉक्टर दिवसभर आपल्याला उपलब्ध होतील.

मा.सभापती साहेब :- बालरोगतज्ञ व भुलतज्ञ यांची पदे आकृतीबंधामध्ये मंजूर असल्याने जाहिरात काढून त्वरीत भरण्यात यावी.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- बिंदूनामावली मध्ये एकाकी पदाला सुध्दा मा.शासनाची मंजूरी घ्यावी लागते.

मा.सभपाती साहेब :- दवाखन्यामध्ये डॉक्टरांची आत्यावश्यक सेवा पहाता या बाबत मा.शासनाचे मार्गदर्शन घेण्यात येवून भरती प्रक्रीया तात्काळ राबविण्यत यावी.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- या बाबत तात्काळ मार्गदर्शनाची कार्यवाही करण्यात येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मा.शासनाचे मार्गदर्शन आल्यानंतर भरती प्रक्रीया लवकरच पुर्ण होणार असल्याने ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद तीन वर्षाकरीता करार न करता एक वर्षाकरीता नियुक्ती करण्यात यावी.गरज पडल्यास पुन्हा नव्यावे मुदतवाढ देण्यात येईल.

मा.श्री.दिलीप सातपुते :- कै.बा. दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ डॉक्टरांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती करण्याचा विषय मंजूर करावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.एक वर्षा करीता नियुक्ती करण्यात यावी व आवश्यकता वाटल्यास मुदतवाढ देण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार कै.बा. दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ डॉक्टरांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती दिनांक ०१/११/२०१६ पासुन पुढील एका वर्षा करीता करारबध्द पुर्ननियुक्तीस हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चे नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ डॉक्टरांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती दिनांक ०१/११/२०१६ पासुन पुढील एका वर्षा करीता करारबध्द पुर्ननियुक्तीस हि सभा मान्यता देत आहे.

अहमदनगर महानगरपालीकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे पुर्ण वेळ बालरोगतज्ञ व भुलतज्ञ यांची कायम स्वरूपी नियुक्ती करणे आवश्यक असून ही पदे आकृतीबंधामध्ये मंजूर असल्याने बालरोगतज्ञ व भुलतज्ञ यांची जाहिरात काढून ही पदे कामयस्वपी नियुक्ती करण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.सध्या मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना सरळसेवा भरतीच्या वेळी प्रधान्य देण्यात यावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- २ सोमवार दिनांक १०/०४/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री, फिटर यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ : -** पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा १०७४ दि. ०२ / ०१ / २०१७ अन्वयेचा अहवाल

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा. क्र. शहर पाणी पुरवठा १०७४ दि. ०२ / ०१ / २०१७ अन्वये अहवाल सादर करुन त्यामध्ये " संदर्भिय पारीत आदेशा नुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारा नुसार खालील नमुद तांत्रिक हुद्दया प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदांवर दि. २७/०७/२०१६ रोजी पासुन ६ महिन्या करीता निर्देशित अटी शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. संदर्भिय आदेशातील पाणी पुरवठा विभागा करीता नियुक्त केलेले सर्व कर्मचारी या विभागाकडे हजर झाल्यानंतर सर्वाची अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवर खालील निर्दशित ठिकाणी नेमणुक करण्यात आलेली होती. परंतु कंत्राटी करारानुसार नेमणुक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि. २६/०१/२०१६ रोजी पुर्वी संपुष्टात येणार आहे. व मुदतवाढ मिळणे कामी खालील नमुद कर्मचारी यांनी दि. १३/१२/२०१६ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे. तसेच सदहु कर्मचा-यांची आवश्यकता असले बाबत योजने वरील विजतंत्री श्री. मुळे यांनी दि. ०७ / १२ / २०१६ रोजी इकडेस रिपोर्ट देवुन कळविले आहे.

| अ.क्रं. | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | नेमणुक ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| २ | सोनवणे मनिष कैलास | विजतंत्री | विळद पंपींग स्टेशन |
| ३ | सागर दिलिप जाधव | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| ४ | गणेश बाबाजी शिंदे | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| ५ | राजेश पुंडलिक टाकळकर | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| ६ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| ७ | गोपाळ श्रीकृष्ण इंगळे | फिटर | विळद पंपींग स्टेशन |

यास्तव पाणि पुरवठा विभागाकरीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वरील नमुद हुदयाप्रमाणे वरील नमुद कर्मचा-यांना नियमानुसार तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणे अत्यंत गरजेचे आहे." असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक, विजतंत्री, फिटर या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दिनांक १२/०५/२०१६ रोजीच्या दैनिक नवा मराठा व दैनिक पुढारी या वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या मुलाखती बाबत जाहिराती प्रसिध्दीस देऊन दिनांक ३१/ ०५ / २०१६ रोजी मुलाखती आयोजीत करण्यात आलेल्या होत्या.

सदर प्रसिध्द जाहीरातीच्या अनुषंगाने दिनांक ३१ / ०५ / २०१६ रोजी मा. उपायुक्त तथा अध्यक्ष , निवड समिती , अहमदनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षते खाली मा. निवड समिती यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेऊन त्यामध्ये संबधितांना पात्र ठरवुन निवड केलेली होती.

त्यानुषंगाने सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक,विजतंत्री, फिटर या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर संबधितांची करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती कालावधी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ९,०००/- | जा.क्र. २६८० दि.२७/०७/२०१६ | २७/०७/२०१६ ते २६/०१/२०१६ पासुन सहा महिन्या करीता |
| २ | सोनवणे मनिष कैलास | विजतंत्री | ९,०००/ | जा.क्र. २६८० दि.२७/०७/२०१६ | २७/०७/२०१६ ते २६/०१/२०१६ पासुन सहा महिन्या करीता |
| ३ | सागर दिलिप जाधव | पंपचालक | ९,०००/ | जा.क्र. २६८० दि.२७/०७/२०१६ | २७/०७/२०१६ ते २६/०१/२०१६ पासुन सहा महिन्या करीता |
| ४ | गणेश बाबाजी शिंदे | पंपचालक | ९,०००/ | जा.क्र. २६८० दि.२७/०७/२०१६ | २७/०७/२०१६ ते २६/०१/२०१६ पासुन सहा महिन्या करीता |
| ५ | राजेश पुंडलिक टाकळकर | पंपचालक | ९,०००/ | जा.क्र. २६८० दि.२७/०७/२०१६ | २७/०७/२०१६ ते २६/०१/२०१६ पासुन सहा महिन्या करीता |
| ६ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | ९,०००/ | जा.क्र. २६८० दि.२७/०७/२०१६ | २७/०७/२०१६ ते २६/०१/२०१६ पासुन सहा महिन्या करीता |
| ७ | गोपाळ श्रीकृष्ण इंगळे | फिटर | ९,०००/ | जा.क्र. २६८० दि.२७/०७/२०१६ | २७/०७/२०१६ ते २६/०१/२०१६ पासुन सहा महिन्या करीता |

वरील संबधितांची सदर सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील नेमणुकीची मुदत ही दिनांक २७/०१/२०१६ पासुन समाप्त होत आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतेच मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यामध्ये पान नं. १७ वरील विवरण पत्र क्रमांक २२ मध्ये अनु. क्र. ५ नुसार जल अभियंता विभागासाठी खालील प्रमाणे पद संख्या मंजुर दर्शविण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | पदाचा तपशिल | मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे | व्यपगत |
|---|---|---|---|---|---|
| १ | विजतंत्री | १३ | --------- | १३ | ---------- |
| २ | पंपचालक | १२ | ०३ | १५ | ---------- |
| ३ | फिटर | ११ | --------- | ११ | ---------- |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राज पत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. २२,२४, वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं.५९,६१,७१ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ५९ | तांत्रिक सेवा श्रेणी -३ | पंप चालक | नामनिर्देशन १०० % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उर्तीर्ण<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र<br>क) अनुभवास प्राधान्य. |
| ७१ | तांत्रिक सेवा श्रेणी -३ | वीजतंत्री | नामनिर्देशन १०० % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उर्तीर्ण<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वीजतंत्री अभासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| ६१ | तांत्रिक सेवा श्रेणी -३ | फिटर | नामनिर्देशन १०० % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उर्तीर्ण<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र<br>क) अनुभवास प्राधान्य. |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यंत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करून ती प्रमाणात करून घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील जल अभियंता विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या विजतंत्री , पंपचालक व फिटर यापदी सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायांकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील मंजुर दर्शविण्यात आलेल्या पंपचालक,विजतंत्री, फिटर यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये अत्यंत कमी प्रमाणात पंपचालक,विजतंत्री, फिटर असल्यामुळे तात्काळ नागरिकांना पाणी वितरणामध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संदर्भिय पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा १०७४ दिनांक ०२/०१/२०१६ अन्वयेचा अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक,विजतंत्री, फिटर यापदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ६३,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३,७८,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तातपुरत्या स्वस्पात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ९,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| २ | सोनवणे मनिष कैलास | विजतंत्री | ९,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | सागर दिलिप जाधव | पंपचालक | ९,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ४ | गणेश बाबाजी शिंदे | पंपचालक | ९,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ५ | राजेश पुंडलिक टाकळकर | पंपचालक | ९,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ६ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | ९,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ७ | गोपाळ श्रीकृष्ण इंगळे | फिटर | ९,०००/- | पाणी पुरवठा विभाग |

संदर्भिय पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र.शहर पाणी पुरवठा १०७४ दिनांक ०२/०१/२०१७ अन्वयेचा अहवालाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात पंपचालक,विजतंत्री, फिटर यापदी वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र.सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार काम समाधानकारक असल्यास नविन पुर्ननियुक्तीसाठी महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२ चे कलम ५३ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

१.नस्तीमध्ये पृ.क्र.नोंदविले नाही.

२.नव्या आकृती बंधात एकुण १५ पदे मंजूर असून रिक्त पदे किती आहे.नमुद नाही.

३. सदर मानधना वरील कर्मचा-यांचे मागील काम समाधान कारक असल्याचे विभागाने प्रमाणीत केले नाही.

४. नियमाप्रमाणे तांत्रीक खंड देवून पुन्हा सहा महिन्या साठी मुदत वाढ देण्या ऐवजी पुन्हा नव्याने नियुक्ती आदेश देणे संयुक्तीक राहील.

५.मागील सेवा कोणत्याही कारणासाठी भविष्यात विचारात घेतील जाणार नाही.यांच्या अधिन राहून मागील पृ.क्र.वर अ प्रस्तावीत केल्या प्रमाणे ब प्रमाणे कार्यवाही साठी मा.स्थायी समिती मान्येतेस्तव सादर.

यावर फेरसादर,

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त याची स्वाक्षरी.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालामधिल अ प्रमाणे निर्णया करिता मा.स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री, फिटर यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत विषय आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- या कर्मचा-यांची मुदत केव्हा संपली आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- २७/१/२०१७ रोजी यांची मुदत संपलेली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्यांची मुदत संपल्यानंतर सुध्दा हे कर्मचारी तेथे काम करीत आहेत का? उदया काही दुर्घटना घडली तर त्यास जबाबदार कोण?

मा.श्री.दिलीप सातपुते:- त्यांच कटींग कसे होते.ई .पी.एफ.करीता रजिप्ट्रेशन करावे लागते का?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- १२ टक्के .ई .पी.एफ. जानेवारी पासुन कट होतो.अपघात झाल्यास .ई .पी.एफ.वाले त्यांना दोन लाख रूपये देणार,प्रोफेशन टॅक्स रू.२००/- आहे.

मा.सभापती साहेब :- आपण एखादया व्यक्तीकडून काम करून घेतो.तर त्याला किमान वेतन कायदयानुसार वेतन दयायला पाहिजे ना.

मा.श्री.दिलीप सातपुते :- त्यांच एकतर कटींग करू नका

मा.सभापती साहेब :- किमान वेतन व कमाल वेतन याची माहिती घेवून पुढील सभेमध्ये देण्यात यावी.अन्य महानगरपालिकेची मानधनावरील कर्मचा-यांची माहिती घेवून सादर करण्यात यावी.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- माहिती घेवून पुढील सभेमध्ये देण्यात येईल.

मा.श्री.दिलीप सातपुते :- जुन्या मानधनावरील कर्मचा-यांना किती पगार दिला जातो.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- अंदाजे रूपये २०,०००/- पगार दिला जातो.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- प्राधिकरनाकडील किती कर्मचारी होते.

पा.पु विभाग प्रमुख श्री.काकडे :- ११० कर्मचारी होते.आत्ता सध्या फक्त ४७ कर्मचारी राहिले आहेत.

मा.बाळासाहेब बोराटे :- आकृतीबंधानुसार नियुक्ती करावयाची झाल्यास सध्यामानधनावरील कर्मचा-यांना आपण त्यांची नियुक्ती करणार का?

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- महानगरपालिकेच्या कामाचा अनुभवाचा त्यांना फायदा होणार आहे.

मा.सभापती साहेब :- आकृतीबंधानुसार नियुक्ती च्या वेळी या कामगारांच्या अनुभवानुसार त्यांना प्रधान्य देण्यात यावे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती कलावती शेळके :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री, फिटर यापदांवर दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री, फिटर यापदांवर नियुक्तीची मुदत समाप्तीच्या तारखे नंतर दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती कलावती शेळके सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ३ सोमवार दिनांक १०/०४/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०१५-२०१६ ई -निविदा क्र.१४८२ या निविदेच्या मंजुरीबाबत दौंड रोड ते आव्हाड विट भटटी ते तावरे घर ते दरेकर घरापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुने रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक टाकणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक व ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग
उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१) प्रशासकीय मान्यता : मा.जिल्हाधिकारी यांची दि.२३/१२/२०१६
२) ऑनलाईन ई - निविदा क्र.१४६९ ते १४८२ सन २०१६-१७
३) निविदा विक्री कालावधी - दि.०२/०१/२०१७ ते १६/०१/२०१७
४) निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.२१/०१/२०१७ ते दि.२३/०१/२०१७
५) निविदा उघडण्याची तारीख :- दि.२३/०२/२०१७
६) कामाची मुदत :- ६ महिने
७) प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| ई निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १४८२ | दौंड रोड ते आव्हाड विट भटटी ते तावरे घर ते दरेकर घरापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुने रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक टाकणे | २७,२६,९२०/- | मे.ए.सी.शेख | ०.९९% कमी दराने | मे.गुलशन कंन्स्ट्र.२% कमी दराने |
| | | | मे.गुलशन कंन्स्ट्र. | २.००% मी दराने | |
| | | | मे.ए.पी.सोनीमंडलेचा | १४.००%जादा दराने | |
| | | | मे.बेस्ट कंन्स्ट्र. | ०.९९% कमी दराने | |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषांगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची निविदा स्पर्धात्मक दृष्या कमी दारची म्हणजेच निविदा दरापेक्षा २% कमी दराने असुन ती वाजवी वाटत असल्याने मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची २% कमी दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव तथा मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे तुलनात्मक दृष्टया----

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावित नुसार क्ष प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा असलेने व रक्कम रू.२५ लक्षा पेक्षा असलेने मंजूरीस्तव मा.स्थायी समिती सभेत शिफारस करणे योग्य. मे.आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.



यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०१५-२०१६ ई -निविदा क्र.१४८२ या निविदेच्या मंजुरीबाबत दौंड रोड ते आव्हाड विट भटटी ते तावरे घर ते दरेकर घरापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुने रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक टाकणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरा बाबत विषय आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचा.

त्या नुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या विषयाची सविस्तर माहिती सांगा.

अभियंता श्री.निंबाळकर :- दौंड रोड ते आव्हाड विट भटटी ते तावरे घर ते दरेकर घरापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुने रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक टाकणेकामी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०१५-२०१६ ई -निविदा क्र.१४८२ नुसार निविदा मागविण्यात आली. या कामा करीता मे.ए.सी.शेख, मे.गुलशन कंन्स्ट्र, मे.ए.पी.सोनीमंडलेचा, मे.बेस्ट कंन्स्ट्र. ठेकेदार एजन्सींनी भाग घेतला होता. निविदा धारक मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची निविदा स्पर्धात्मक दृष्या कमी दारची म्हणजेच निविदा दरापेक्षा २% कमी दराने असुन ती वाजवी वाटत असल्याने मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची २% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभे समोर सादर करण्यात आली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची निविदा स्पर्धात्मक दृष्या कमी दारची म्हणजेच निविदा दरापेक्षा २% कमी दराने असुन ती वाजवी वाटत असल्याने मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची २% कमी दराची निविदा मंजूर करण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची निविदा कमी दारची असून निविदा दरापेक्षा २% कमी दराने असल्याने मंजूर करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०१५-२०१६ ई -निविदा क्र.१४८२ या निविदेच्या मंजुरीबाबत दौंड रोड ते आव्हाड विट भटटी ते तावरे घर ते दरेकर घरापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुने रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक टाकणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्याच्या अनुषांगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची निविदा स्पर्धात्मक दृष्या कमी दारची म्हणजेच निविदा दरापेक्षा २% कमी दराने असुन ती वाजवी वाटत असल्याने मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची २% कमी दराच्या निविदा दरास हि सभा मान्यता देत आहे

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०१५-२०१६ ई -निविदा क्र.१४८२ या निविदेच्या मंजुरीबाबत  दौंड रोड ते आव्हाड विट भटटी ते तावरे घर ते दरेकर घरापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुने रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक टाकणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्याच्या अनुषांगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची निविदा स्पर्धात्मक दृष्या कमी दारची म्हणजेच निविदा दरापेक्षा २% कमी दराने असुन ती वाजवी वाटत असल्याने मे.गुलशन कंन्स्ट्र.यांची २% कमी दराच्या निविदा दरास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ४ सोमवार दिनांक १०/०४/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. महादेव मारूती कोलते , रा. बोल्हेगाव रोड नागापुर,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७३, बील क्रमांक ४४२ चे मालमत्ताधारक नळ कनेक्शन नाही पाणीपटटी सन २०१३-२०१४ ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सावेडी प्रभाग समिती क्र.१

नागापुर उपविभाग कार्यालय वॉर्ड क्र.७३,बील नं.४४२ वसुली लिपिक श्री.के.एम.लांडगे यांज कडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,वॉर्ड क्र७३ मधील मालमत्ता धारक श्री.महादेव मारूती कोलते रा.बोल्हेगांव नागापुर अ.नगर यांनी दि.११/०७/२०१६ रोजी इकडील कार्यालयाकडे अर्ज दाखल करून कळविले आहे की,वॉर्ड नं.७३ बील.नं.४४२ पाणी नळकनेक्शन नसुन त्याची नोंद लागलेली आहे.पाणीपट्टी रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

मालमत्ता धारक यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार दि.१२/७/२०१६ मनपा पाणीपरवठा कर्मचारी श्री. पाचारणे यांचे समक्ष स्थळ जागा पाहणी केली असता नळ कनेक्यान आढळून आलेले नाही.

मालमत्ता धारक यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार तसेच मनपा पाणीपुरवठा कर्मचारी यांचे समक्ष पाहणी रिपोर्ट नुसार आलेली पाणीपट्टी रू.११२५०/- + शास्ती सन २०१३-१४ तसेच त्यापुढील होणारी शास्ती वसुल न होणारी रक्कम मुंबई प्रांतीक मनपा अधिनियम १९४९ मधिल कलम १५२ अन्वये वसुल न होण्याजोगी रक्कम निर्लेखित करणे आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कराबद्दल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी स्वखर्चा बद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम यांचे मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल तथापी बील.नं.४४२ वॉर्ड क्र.७३ सन१३-१४ अखेर थकीत पाणीपट्टी रू.११२५० + शास्ती व त्यापुढील शास्तीसह रक्कम निर्लेखित होण्याकामी अहवाल मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांचे प्रस्तावाप्रमाणे तसेच पाणीपुरवठा कर्मचारी श्री.पाचारणे यांचे समक्ष स्थळ जागा पाहणी रिपोर्टनुसार मुंबई प्रंतिक मनपा अधि.१९४९चे कलम१५२ नुसार सन १३-१४ अखेर पाणीपट्टी रू.११२५० शास्ती व त्यापुढील शास्तीसह रक्कम निर्लेखित होणे सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार सदर मालमत्ता ही गाळा असुन सदर मालमत्तेस नळ कनेक्शन नसलेबाबत पाणीपुरवठा फिटर यांनी दि.१२/७/१६ रोजी पाहणी करून अहवाल दिला आहे.त्यानुसार सदर थकबाकी निर्लेखित करणेकरिता प्रस्तावात नमुद अधिनियमातील तरतुदीनुसार मा.स्थायी समितीची मान्यता घेणे उचित वाटते.सबब आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,पहाणी अहवाल समक्ष प्रधिका-यांच्या स्वाक्षरीने सादर करावा.

यावर प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.१ यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मनपा अधिनियम चे प्रकरण ८ कराधान नियम २०,१ (फ) अन्वये कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांची सहमती दर्शाक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. महादेव मारूती कोलते , रा. बोल्हेगाव रोड नागापुर,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७३, बील क्रमांक ४४२ चे मालमत्ताधारक नळ कनेक्शन नाही पाणीपटटी सन २०१३-२०१४ ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत विषय आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेमध्ये विषय क्रमांक ४ हा विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचा आहे.निर्लेखित करणे करीता या संबंधीत सर्व अधिकारा-यांनी खात्री केलेली आहे का ?

मा.उपायुक्त श्री. बेहेरे :- या बाबत सर्व संबंधीत क्लार्क व फिटर यांचे रिपोर्ट घेवून प्रत्यक्ष स्थळ पहाणी करून खात्री करून रक्कम निर्लेखित करण्यात येते.

मा.बाळासाहेब बोरोटे :- हा विषय पाणीपट्टी निर्लेखित करण्याचा असल्याने मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मनोज दुलम :- पाणीपट्टी निर्लेखित करण्याचा विषय असल्याने मंजूर करावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- विषय मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री. महादेव मारूती कोलते , रा. बोल्हेगाव रोड नागापुर,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७३, बील क्रमांक ४४२ या मालमत्तेवर नळ कनेक्शन नसल्याने पाणीपटटी सन २०१३-२०१४ ची रक्कम निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा. सभेमध्ये आजच डॉ.संदिप लालचंद सुराणा यांनी अर्ज दाखल करून जी.एल.आर.सर्व्हे नं. ४मधील आरक्षण क्र.७० या आरक्षीत भूखंडात विकसीत करून बांधकाम केलेले तळमजला,पहिला व दूसरा मजला महानगरपालिकेस भाडेतत्वावर मिळणे करीता मागणी केली आहे.या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे का?

नगररचनाकार श्री.पाटील :- बांधकाम पुर्ण झाले आहे.

मा.सभापती साहेब :- अर्जामध्ये नमुद श्री.सुराणा यांच्या मालकीचा भुखंड क्र३ब व आरक्षीत भूखंड एकत्रीत विकसीत केल्यास महानगरपालिकेस विनामोबदला आरक्षीत भूखंडा वरील मंजूर बांधकामापैकी २५% क्षेत्र बांधून हस्तांतर करण्याचे कबूल केल्या नुसार दि.३/४/२०१७ रोजी त्यांनी महानगरपालिकेस हस्तांतर केले आहे का?

नगररचनाकार श्री.पाटील :- जी.एम.आर.सर्व्हे नं.४ मधील आरक्षणाचे क्षेत्र ७२८ चौ.मीटर व त्यामागील मंजूर रेखांकनातील भुखंड क्र.३ ब चे क्षेत्र ७०९.५८ चौ.मी. या दोन्हीचे एकत्रीत क्षेत्र १३३७.५८ चौ.मी.एकत्रीत करून प्रस्ताव नगररचना विभागाकडे मंजूरीकरीता सादर केला होता.मंजूर बांधकामापैकी २५% क्षेत्र हे महानगरपालिकेस विनामोबदला हस्तांतरण करण्याचे धोरण ठरविले आहे.त्यानुसार मा.उपसंचालक नगररचना नाशिक यांनी मंजूरी दिलेली आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- पाणीपट्टी निर्लेखित करण्याचा विषय असल्याने मंजूर करावा.महानगरपालिकेस या जागेचा काय उपयोग होवू शकतो.आपण तर ही जागा भाडयाने देणार असणार तर महानगरपालकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने अर्जदार डॉ.सुराणा यांनी अर्ज केला असल्याने त्यांना ही जागा भाडेतत्वार देण्यात यावी.

मा.श्री.मनोज दुलम :- पाणीपट्टी निर्लेखित करण्याचा विषय असल्याने मंजूर करावा. मनपाच्या उत्पन्नाच्या दृष्टीने अर्जदार डॉ.सुराणा यांनी अर्ज केला असल्याने त्यांना ही जागा भाडेतत्वार देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- भूखंड क्र.७० मधील तळमजल्यावरील क्षेत्र ६२ चौ.मी.पहिल्या मजल्यावरील क्षेत्र ६२ चौ.मी.व दुस-या मजल्यावरील क्षेत्र ६२ चौ.मी.असे एकूण १८६ चौ.मी.क्षेत्राचे बांधकाम करून महानगरपालिकेस मालकी हक्काने दिले आहे. व त्यालगतचे सदर इमारतीचे इतर बांधकाम डॉ.सुराणा यांच्या मालकीचे व कब्जाचे आहे.या दोन्ही इमारती एकमेकास सलग्न आहेत.महानगरपालिकेचे क्षेत्र हे सध्या रिकामे असून महानगरपलिकेस उपयोग नाही.त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने सदर जागा ही अर्जदार श्री.डॉ.संदिप लालचंद सुराणा यांना अटी व शर्ती नुसार ११ वर्ष मुदतीने देण्यात यावी व नियमानुसार भाडे , अनामत रक्कम आकारण्यात यावी.या जागा देण्याच्या अर्जाबाबत संबंधीत विभागांनी आवश्यक कार्यालयीन कार्यवाही पुर्ण करावी. नियमाप्रमाणे भाडे आकारणी करून देण्यात यावी.

**ठराव :-** विषय क्र.४ ते ६ विषय मंजूर करावे.ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री. महादेव मारूती कोलते , रा. बोल्हेगाव रोड नागापुर,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७३, बील क्रमांक ४४२ वर नळ कनेक्शन नसल्याने पाणीपटटी सन २०१३-२०१४ ची रक्कम निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

| 364 | Humidity Bottal | | 1 Nos. | 170=25 |
| 365 | I. V. Stand – Casted base-with Central s. s. rod. | | 1 Nos. | 1362=00 |
| 367 | Printing role for Elisa Reader. | | 1 Roll | 90=80 |
| 372 | Liss/Combs Card 6 x (4 x 12 Cards) | Diamed / Biored | 288 Test. | 13393=00 |
| 373 | ID –Diluent –2 | Diamed / Biored | 1 x 500 ml | 8285=50 |
| 374 | Nacl /Enzyme Tests 6 x (4 x 12 Cards) | Diamed / Biored | 288 Test | 13279=50 |
| 377 | Blood bank Reagent Refrigerator | Terumo Penpol/ Labtop/ Meditek / Accurete | 1 Nos. | 124850=00 |
| 391 | Sodium Hypochlorite Solution (Chlorine Water) | Mediclor/ Saniclor | 1 x 100 ml Bottle | 37=10 |
| 392 | Boyles Apparatus Stainless steel | Vactech | 1 Nos. | 90800=00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 393 | Wheel Chair folding | Imported | 1 Nos. | 4200=00 |
| 401 | Ultra Sound Jelly | Generic | 1 x 5 Litter | 360=40 |
| 402 | B. P. Bulb | | 1 Nos. | 34=05 |
| 405 | Autoclave Drum Ring | Silicon | 1 Nos. | 510=75 |
| 422 | Labour table telescopic with head low-up, side railing full SS | | 1 Nos. | 31780=00 |
| 428 | Fowler bed – MS<br>Size - 2134 x 762 x 610 mm | | 1 Nos. | 10782=50 |
| 429 | Dressing Trolley – full S.S | | 1 Nos. | 6810=00 |
| 430 | Mayo's Trolley – Small<br>full S.S | | 1 Nos. | 5675=00 |
| 432 | O. T. Table – Hydraulic Operated<br>Size – L 1830 x W 497 mm<br>with mattress with Gynec accessories. | | 1 Nos. | 85125=00 |
| 441 | MVA Syringe | | 1 Nos. | 1475=50 |
| 442 | Chittals forceps Long 8"<br>10" | Chattarjee | 1 Nos<br>1 Nos | 454=00<br>510=75 |
| 443 | Disposable cord clamp | | 1 Nos. | 5=67 |
| 445 | Doyen's Retractor | | 1 Nos. | 397=25 |
| 446 | artery forcep –<br>8" | Chattarjee | 1 Nos | 340=50 |
| 447 | Allies forceps – 6"<br>8" | Chattarjee | 1 Nos<br>1 Nos | 283=75<br>340=50 |
| 448 | Needle holder<br>8" | Chattarjee | 1 Nos | 340=50 |
| 449 | Babcock Forcep 6"<br>8" | Chattarjee | 1 Nos.<br>1 Nos. | 283=75<br>340=50 |
| 451 | Spong holder 8"<br>10" | Chattarjee | 1 Nos<br>1 Nos | 454=00<br>510=75 |
| 452 | Stretcher canvas sheets | | 1 Nos. | 794=50 |
| 453 | Suture needle | | 6 Needls x 1 Pkt. | 24=97 |
| 463 | Kochers Clamp 8"<br>10 " | Chattarjee | 1 Nos<br>1 Nos | 454=00<br>510=75 |
| 464 | Ovum Forcep | Chattarjee | 1 Nos. | 454=00 |
| 465 | Vollselum | Chattarjee | 1 Nos | 454=00 |
| 466 | Heggars Dilator Set | Chattarjee | 1 Nos | 1816=00 |
| 467 | E.P. Scissor | Chattarjee | 1 Nos | 283=75 |
| 468 | S/B Currate | Chattarjee | 1 Nos | 227=00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 469 | Lengan Back Retractor | Chattarjee | 1 Nos | 227=00 |
| 470 | Glucometer | Akkiscan | 1 Nos | 1702=50 |
| 471 | Glucometer Strips | Akkiscan | 25 Nos<br>50 Nos<br>100 Nos | 510=75<br>908=00<br>1475=50 |
| 475 | R.T. Thermometer with sensor Digital | | 1 Nos | 964=75 |
| 476 | Weighing Scale Digital 1 kg | | 1 Nos | 2837=50 |
| 477 | Autoclave lable | Chempak | 1 x 50 nos. | 510=75 |
| 479 | Amniosac | Harshal | 1 Nos | 136=20 |
| 480 | Hi-Viral Transport medium | Hi-Media | 1 Nos | 12485=00 |

**निविदाकार - ऑस्टीन हेल्थ केअर,पुणे.**

| Sr. No | Name of the Drug /Chemical / Medical Instruments | Manufacturing Company | Packing Quantity | Rate |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 3 | Inj.Promethazine hydrocloride-2ml Amp | Jackson / Zenlab / Generic | 1 Ampoule | 2=90 |
| 5 | Inj. Adrenaline Chloride 1ml Amp | /Jackson / Generic | 1 Ampoule | 4=58 |
| 9 | Inj. Succinyl cholin | Jackson / Generic | 1 vial | 42=44 |
| 10 | Inj.Mephentine Amp | Jackson / Generic | 1 vial | 125=00 |
| 12 | Inj. Metaclo pramide HCL- 2 ml Amp | Jackson / Generic | 1 Ampoule | 2=55 |
| 16 | Inj. Cefotaxime Sodium – 1gm | Jackson / Generic | 1 Vial | 19=60 |
| 17 | Inj.Oxytocin 1ml | / Cadila | 1 Ampoule | 3=69 |
| 23 | Inj.Ondensetron – 2 ml | Jackson / Generic | 1 Ampoule | 3=14 |
| 31 | Inj. Diclofenac Sodium 25 mg in 3 ml | Germam Remidies | 1 Ampoule | 2=47 |
| 34 | Inj.Ceftriaxone 1 gm | Jackson / Generic | 1 Vial | 18=80 |
| 35 | Inj.Amoxycilline + Clavulanate 1.2 gm | Jackson / Generic | 1 Vial | 45=00 |
| 36 | Inj. Theophyllin and Etophyllin | Jackson / Generic | 1 Ampoule | 3=00 |
| 38 | Inj. Ethamsylate | Jackson / Generic | 1 Ampoule | 5=00 |
| 39 | Inj.Tranexamic Acid 500mg | Jackson / Generic | 1 Ampoule | 16=00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 41 | Inj.Piperacilline + Tazobactom 4.5gms | Jackson / Generic | 1 vial | 112=70 |
| 44 | Inj.Ceftriaxone Sodium + Tazobactom 1.gm +125mg | Jackson / Generic | 1 vial | 37=60 |
| 48 | I.V. Ringer Lactate 500ml | Baxter | 1 Bottle | 28=45 |
| 56 | Tab.CPM + PCM+Phenylephrine HCL | CPM + Phenylephrine + Cet | 1 x 10 Tabs. | 4=65 |
| 57 | Tab.Bisacodyl | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 4=24 |
| 58 | Tab.Ampicillin 125 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 7=00 |
| 60 | Tab.Sulphamethaxazole + Trimethoprim - P | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 11=88 |
| 63 | Tab.Dicyclomine HCL | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 1=87 |
| 66 | Tab.Metronidazole-200 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 4=90 |
| 67 | Tab Metronidazole-400 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 7=84 |
| 69 | Tab. Mebendazole | Jackson / Generic | 1 x 6 Tabs | 2=39 |
| 71 | Tab.Cephalexin 500 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 39=20 |
| 72 | Tab.Ciprofloxacin 250 m.g | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 11=83 |
| 75 | Tab.Ibuprofen-200 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 4=58 |
| 76 | Tab. Ibuprofen – 400mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 7=64 |
| 78 | Tab.Metoclopramide HCL – 10 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 2=88 |
| 80 | Tab.Sinuss 77 | Orison / AHC Para + Cetrizine + Phenylephrine | 1 x 10 Tabs | 4=65 |
| 81 | Tab. Diclofenac Sodium SR 100 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 5=50 |
| 82 | Tab. Erythromycin . 250 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 23=75 |
| 83 | Tab. Albendazole 400 mg / Tab. Zental | Wallace / Generic | 1 Tabs | 2=35 |
| 84 | Tab.Fluconazole . 150 mg | Wallace / Generic | 1 x 10 Tabs | 3=92 |
| 86 | Tab.Domperidone 10 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 2=88 |
| 88 | Tab.Cefadroxyl –500 mg | Alembic | 1 x 10 Tabs | 18=00 |
| 89 | Tab.Norfloxacin 400 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 15=68 |
| 90 | Tab.Ofloxacin 200 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 11=76 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 91 | Tab.Norfloxacin with tinidazole | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 28=22 |
| 93 | Tab.Ethamsylate 500 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 13=58 |
| 95 | Tab.Omeprazole-20mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 5=50 |
| 97 | Tab.Mox-kid 125 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs | 6=58 |
| 100 | Tab.Amoxycilline + Cloxacilline 250 mg (Kid) | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 13=33 |
| 101 | Tab. Cefixime 100 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 25=46 |
| 102 | Tab. Cefixime 200 mg | AHC / Standard | 1 x 10 Tabs. | 35=75 |
| 104 | Tab. Ciproflaxacine + Tinidazole | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 32=92 |
| 105 | Tab. Ofloxacine + Tinidazole | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 28=86 |
| 107 | Tab.Folic Acid | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 2=77 |
| 116 | Tab. Amoxycilline 250 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 12=10 |
| 117 | Tab. Amoxycilline 500 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 22=60 |
| 118 | Tab.Nimesulide + paracetamol | AHC / Arion / L.V. / Lifesciences | 1 x 10 Tabs. | 4=27 |
| 119 | Tab. Nimesulide | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 2=66 |
| 121 | Tab. Pantoprazole 40 mg | Jackson / Generic | 1 x 10 Tabs. | 6=58 |
| 122 | Cap. Moxclave 625 mg | Arion / orison | 1 x 10 Tabs. | 48=25 |
| 124 | Cap.Ampicillin - 250 mg. | Jackson / Generic | 1 x 10 Caps | 13=33 |
| 125 | Cap. Ampicillin - 500mg | Jackson / Generic | 1 x 10 Caps | 25=00 |
| 126 | Caps.Doxycycline | Jackson / Generic | 1 x 8 Caps | 12=24 |
| 127 | Cap. B-Complex | Jackson / Generic | 1 x 10 Caps | 7=05 |
| 128 | Cap.Ampicilline + Cloxacilline 500 mg | Jackson / Generic | 1 x 10 Caps | 24=00 |
| 136 | Chlorpheniramine Maleate + Paracetamol Susp | Arion / AHC / Generic | 1 x 60 ml Bottle | 9=99 |
| 140 | Cough Syrup Jar | Asuwaldi | 1 x 4.5Ltr.Jar | 165=00 |
| 142 | Gelusil MPS Liquid | Asuwaldi / AHC / Generic | 1 x 170ml Bottle | 17=94 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 144 | Drabkins Solution E std Solution | Arkray (Span) | 1 Jar x 5 Litres | 527=80 |
| 145 | Povidone Iodine Oint | Wallace / Generic | 1 x 250gm Pkt. | 106=14 |
| 146 | Candid-v-gel | Shrideep | 1 x 30 gm | 25=00 |
| 147 | Syp.Albendazole– (Zental) | Jackson / Generic | 1 x 10 ml Bottle | 6=27 |
| 148 | Syp.Mox | Jackson / Generic | 1 x 30 ml Bottle | 12=54 |
| 149 | Syp.Domperidone | Jackson / Generic | 1 x 30 ml Bottle | 10=97 |
| 153 | Pyrimon eye drops | Jackson / Generic | 1 x 5 ml Drop | 11=88 |
| 154 | Genticyn eye drops | Jackson / Generic | 1 x 5 ml Drop | 8=62 |
| 157 | Protein Powder | AHC / Asuwaldi / Generic | 1 x 200 gm Pkt. | 53=00 |
| 159 | Absorbent cotton | United Surgical Industries | 1 x 400gm Pkt. | 88=00 |
| 176 | Inj. Oxystar 1ml (Oxytocin) | | 1 amp | 3=28 |
| 187 | ORS / Electrolyte powder ( Prolyte )pkt – 21.5gm | Jackson / Generic | 1 Pkt. | 3=55 |
| 189 | Blood Transfusion Set | Shri Umiya Surgical / Generic | 1 Nos | 10=27 |
| 191 | Pregnancy Test Kit Velocite | Lupin Pharma | 1 Test. | 11=30 |
| 194 | O2 mask | Shri Umiya Surgical / Generic | 1 Nos | 31=65 |
| 198 | Alkaline Phosphate | | 1 kit | 423=75 / 10 x 5 ml |
| 199 | Creatinine | Arkray (Span) | 1 kit | 619=80 / 2 x 125 ml |
| 206 | Barium chloride solution | Pathozyme Diagnostics | 1 Nos | 107=60 |
| 207 | S-Albumin | Arkray (Span) | 1 Nos | 141=75 / 100 ml |
| 208 | S-Protein | | 1 Nos | 140=24 / 100 ml |
| 210 | Tab. Zifi 200mg /Cefixime | AHC/Jackson / Generic | 1 x 10 tabs | 35=80 |
| 213 | Povidone Iodine Ointment 15 gm | Zenlab / Generic | 1 Nos | 11=60 |
| 217 | Sodium Hypochlorite solution 10% | Pathozyme Diagnostics | 1 x 5000 ml | 338=00 |
| 219 | Methylene Blue | Arkray (Span) | 1 x 125 ml Bottle | 135=70 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 221 | Serum Urea Kit | Arkray (Span) | 1 x 20 Test Kit | 924=00 / 400 ml |
| 222 | Blood Sugar Kit | Arkray (Span) | 1 x 132 Test Kit | 671=00 / 10 x 100 ml |
| 223 | HIV Elisa Test | Arkray (Span) | 1 x 96 Test Kit | 1441=00 |
| 225 | HBs Ag Elisa Test | Arkray (Span) | 1 x 96 Test Kit | 1397=00 |
| 227 | R.A.Test Kit. | Arkray (Span) | 1 x 20 Test Kit | 301=75 |
| 229 | SGOT Kit | Arkray (Span) | 10 x 10 ml | 845=90 |
| 230 | Total Protein Kit | Arkray (Span) | 1 x 100 ml Bottle | 157=65 |
| 234 | HIV (Tri-Dot-Rapid)Kit | Arkray (Span) | 1 x 50 Test Kit | 3122=00 |
| 235 | Uric acid Lab Kit | Pathozyme Diagnostics | 1 Kit. | 518=35 / 2 x 50 ml |
| 236 | SGPT Kit | Pathozyme Diagnostics | 1 Kit. | 302=37 / 2 x 25 ml |
| 237 | Alkaline phosphate Kit | Pathozyme Diagnostics | 1 Kit. | 432=00 / 2 x 50 ml |
| 243 | Hydrochloric Acid N/10 | Arkray (Span) | 1 x 500 ml Bottle | 89=80 |
| 244 | Sodium Citrate 3.8%W/V | Arkray (Span) | 1 x 500 ml Bottle | 163=00 |
| 251 | Anti-D Serum Monoclonal | Arkray (Span) | 1 x 10 ml Vial | 238=68 |
| 253 | Anti AB Serum | Arkray (Span) | 1 x 10 ml Vial | 191=00 |
| 255 | Coombs sera Anti human globin | Arkray (Span) | 1 x 10 ml Vial | 466=00 |
| 256 | Coombs sera Anti human globin | Arkray (Span) | 1 x 5 ml Vial | 268=00 |
| 257 | Bovine Albumine 22% | Arkray (Span) | 1 x 5 ml Vial | 191=00 |
| 258 | VDRL Test Kit RPR | Arkray (Span) | 1 x 50 Test Kit | 198=00 |
| 259 | VDRL Test Kit Trust | Arkray (Span) | 1 x 50 Test Kit | 330=00 |
| 260 | Widal Test 4 x 5 ml | Arkray (Span) | 4 x 5 ml | 288=00 |
| 261 | Glucose – GOD / POD | Arkray (Span) | 10 x 100 ml | 650=00 |
| 276 | Sterilized hand Gloves No.,6 ½ | Hi-care | 1 x 50 Pairs | 603=00 |
| 277 | Sterilized hand Gloves No.7, | Hi-care | 1 x 50 Pairs | 603=00 |
| 278 | Sterilized hand Gloves No.7 ½, | Hi-care | 1 x 50 Pairs | 603=00 |
| 279 | Sterilized hand Gloves No.6, | Hi-care | 1 x 50 Pairs | 603=00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 280 | Non Sterilized hand Gloves No.6, 6 ½, 7, 7 ½ | Shri Umiya Surgical / Generic | 1 x 25 Pairs | 409=00 |
| 317 | Dispo Bags – Waste Segregation Bags-<br>colour Yellow,Red,Blue,Black | Bell Cross | 1 Kg. | 220=00 |
| 318 | Ultrasonic Nebulizer | Technocare | 1 Nos. | 6930=00 |
| 337 | Endotrachial tube Plain & Cuffed | / Shri Umiya Surgical / Generic<br><br>/ Shri Umiya Surgical / Generic | 1 Nos. | 65=18<br>Size – 5 to 9.5<br><br>34=71<br>Size – 2 to 5.5 |
| 352 | Lancets (Mid-Point) Disposable | Easycare | 1 x 200 Nos. | 125=00 |
| 357 | Gynac Examination Tables stainless steel<br>Size – 24" x 72"x30" | /Sanjivani Hospital Furniture | 1 Nos. | 12715=00 |
| 368 | Blood collection monitor. | Mediteck | 1 Nos. | 81150=00 |
| 369 | Blood Weighing scale | Mediteck | 1 Nos. | 25350=00 |
| 370 | Blood bag tube sealer Dielectric radio frequency sealing system. | Mediteck | 1 Nos. | 98000=00 |
| 378 | Laminar Air Flow Bench (Stainless steel) | Mediteck | 1 Nos. | 186000=00 |
| 415 | I. V. Stand Full S.S. | Sanjivani Hospital Furnitur | 1 Nos. | 2037=00 |
| 417 | Overbed Table Height Adjustable | Sanjivani Hospital Furnitur | 1 Nos. | 9520=00 |
| 418 | Multipara Monitors 12.1Color TFT Display ECG SIO2 Nibs Resp-2Temp,PR(Optional – ETC02,IBP)Builtin Rechargeable Battery ECG Wave Form of7-lead display suitable for adult,paediatric,neonatal | Technocare | 1 Nos. | 58630=00 |
| 423 | Instrument Cabinet with three side glass Size - 1800 mm x 800 mm x 400 mm | Sanjivani Hospital Furnitur | 1 Nos. | 18745=00 |
| 425 | Revolving Stool - S. S. full<br>Size - 305 x 550 x 800 mm | Sanjivani Hospital Furnitur | 1 Nos. | 2040=00 |
| 426 | Revolving Stool - S. S. top<br>Size - 305 x 550 x 800 mm | Sanjivani Hospital Furnitur | 1 Nos. | 1360=00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 427 | Fowler bed – full S.S<br>Size - 2134 x 762 x 610 mm | Sanjivani Hospital Furnitur | 1 Nos. | 20375=00 |
| 433 | O. T. Lamps -<br>Ceiling Surgical operating Light with Halogen Bulb with 80000 to 90000 Lux | Sanjivani Hospital Furnitur | 1 Nos. | 35000=00<br>20" Simngle dome |
| 434 | O. T. Lamps -<br>Mobile Surgical operating Light with Halogen Bulb with 80000 to 90000 Lux | Sanjivani Hospital Furnitur | 1 Nos. | 34000=00<br>20" Simngle dome |
| 438 | Fridge Single Door<br>180 Litre / 200 Litre | Videocon | 1 Nos. | 16515=00<br>190 Ltr. |
| 455 | Sanitary Napkins | Aakruti Products | 1 x 10 Nos. | 20=70<br>(With Wings)<br><br>22=20<br>(Without Wings) |
| 457 | Inj.Pantoprazole 40mg | Jackson /Generic | 1 Nos | 14=10 |
| 459 | Inj.Hydrocortisone Sodium Succinate 100mg | Jackson /Generic | 1 vial | 21=60 |
| 461 | Tab.Aceclofenac 100mg | Jackson /Generic | 1 x 10 tabs | 00=40 |
| 462 | Tab. Serratiopeptidase 10mg | Jackson /Generic | 1 x 10 tabs | 00=65 |

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अ.नगर,मनपा चे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षा करिता मनपा दवाखन्यासाठी व रक्तपेढीसाठी लागणारी सर्व प्रकारची औषधे,रसायने,वैद्यकिय साहित्य व उपकरणे इ.पुरवठा वार्षिक निविदा दर मंजूरी प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.सभापती साहेब :- मनपाला आवश्यक असणारी औषधे खरेदी करताना ती जेनेरीक प्रकारातली खरेदी करा. रिपोर्ट मधील औषधे जेनेरीक आहेत का?

वैद्यकीय आरोग्य आधिकारी डॉ.श्री.बोरगे :- होय.

मा.सभापती साहेब :- आपण टेंडर काढतांना ही औषधा चे नांव टाकले जाते त्या ऐवजी औषधाचे कंन्टेन सुध्दा नमुद करण्यात यावे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- या औषधांबाबतची सविस्तर माहिती सांगा.

वैद्यकीय आरोग्य आधिकारी डॉ.श्री.बोरगे :- सदर प्रकरणामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दवाखान्यांसाठी व रक्तपेढी करीता लागणा-या सर्व प्रकारचे औषधे,रसायने,वैदयकीय साहित्य व उपकरणे इ.खरेदी करणे कामी निविदा मागविण्यात आल्या आहे.

मा.सभापती साहेब :- किती बार्बीची निविदा काढण्यात आली आहे.

वैद्यकीय आरोग्य आधिकारी डॉ.श्री.बोरगे :- सदर प्रस्तावात १ ते ६ बाबींकरीता निविदा मागविण्यात आल्या आहे.परंतु बाब क्र.१ ते ३ मधील औषधे,रसायने,वैदयकीय साहित्य व उपकरणे इ.करीता निविदा प्राप्त झालेल्या नाहीत.बाब क्र.४ मधील औषधे,रसायने,वैदयकीय साहित्य व उपकरणे हे खुपच यांची मागणी कै.बादे दवाखना येथे कार्यरत असणारे स्त्ररोग तज्ञ तसेच रक्तपेढीमधील रक्तसंक्रमण अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे व ब-याच वर्षापासून वापरात असलेल्या कंपन्यांचे मागणी आत्यावश्यक असून त्यांची आपल्याला तातडीची गरज असल्याने आपण औषधांची मागणी केलेली आहे. केलेल्या मागणी नुसार व महानगरपालिकेच्या खरेदी समिती समोर झालेल्या चर्चे नुसार खरेदी बाबतचा निर्णय स्थायी समितीने घेण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ही औषधे कोणत्या वर्षा करीता खरेदी करायचा दर आहे.

वैद्यकीय आरोग्य आधिकारी डॉ.श्री.बोरगे :- सन २०१६-१७ करीता चे दर आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सन २०१६-१७ हे आर्थिक वर्ष संपले आहे.

वैद्यकीय आरोग्य आधिकारी डॉ.श्री.बोरगे :- दर मंजूरीचा विषय असून प्रस्तावातील दर हे सन २०१६-१७ या वर्षाचे आहेत.

मा.सभापती साहेब :- सन२०१७-१८ करीता पुन्हा निविदा काढणार का ? निविदा प्रक्रिया मध्ये वेळ वाया जाणार आहे.औषधे कधी खरेदी करणार,नागरीकांना औषधे कधी पुरविणार.याच दराने पुरवठादार औषधे पुरवठा करणार असेल तर पुढच्या वर्षी करीता देखील प्रस्तावातील दराने खरेदी करावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मध्ये प्रस्तावीत केलेले दर सन २०१६-१७ करिता असले तरी पुढील वर्षी पुन्हा दर मंजूर करणे करीता पुन्हा निविदा प्रक्रीया करावी लागेल या मध्ये बराच वेळे वाया जातो.दवाखान्यांमध्ये औषधांची कमतरता भासत असल्याने नागरिकांची गैरसोय होते.या करीता आपल्याला याच दराने पुरवठादार पुढील वर्षा करीता औषधे पुरविण्यास तयार असल्यास हेच दर मंजूर करून प्रस्तावीत औषधे खरेदी करावे.विषय मंजूर करावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- विषय मंजूर करावा.पुढील वर्षा करिता याच दराने खरेदी करावी.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावातील १ ते ६ बाबींकरीता निविदा मागविण्यात आल्या आहे.परंतु बाब क्र.१ ते ३ मधील औषधे,रसायने,वैदयकीय साहित्य व उपकरणे इ.करीता निविदा प्राप्त झालेल्या नाहीत.यास्तव मनपाच्या गरजे नुसार व आवश्यकते नुसार फेरनिविदा मागविण्यात याव्याव.बाब क्र.४ मधील औषधे,रसायने,वैदयकीय साहित्य व उपकरणे यांची निकड पहाता प्राप्त झालेले दरास व खरेदीस ही सभा मान्यता देते आहे.बाब क्र.५ व ६ संबंधित निविदाकार यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी असणारे निविदा दरास व खरेदीस मान्यता देण्यात येत आहे. गोरगरीब जनतेस सुविधा उपलब्ध होणेकामी ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.तसेच पुढील वर्षा करीता याच दराने औषधे खरेदी करावी.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्टानुसार सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरिता अ.नगर म.न.पा. दवाखान्यासाठी व रक्तपेढीसाठी लागणारी सर्व प्रकारची औषधे, रसायने, वैद्यकीय साहित्य व उपकरणे इ. पुरवठा वार्षीक दर मंजुरीबाबत झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावातील बाब क्र. १ ते ६ करीता निविदा मागविण्यात आल्या आहे.परंतु बाब क्र.१ ते ३ मधील औषधे,रसायने,वैदयकीय साहित्य व उपकरणे इ.करीता निविदा प्राप्त झालेल्या नाहीत.यास्तव मनपाच्या गरजे नुसार व आवश्यकते नुसार फेरनिविदा मागविण्यात याव्यात.
महानगरपालकेच्या खरेदी समिती समोर झालेच्या चर्चे नुसार बाब क्र.४ मधील औषधे,रसायने,वैदयकीय साहित्य व उपकरणे यांची निकड पहाता प्राप्त झालेले दरास व खरेदीस ही सभा मान्यता देते आहे.बाब क्र.५ व ६ संबंधित निविदाकार यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी असणारे निविदा दरास व खरेदीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच पुढील वर्षा करीता याच दराने औषधे,रसायने,वैदयकीय साहित्य व उपकरणे याच दराने खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे. विषय सर्वानुमते मंजूर. खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ८ सोमवार दिनांक १०/०४/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे स्थानिक निधी लेखापरिक्षण सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ चा लेखा परिक्षण अहवाल मा.स्थायी समितीपुढे सादर करणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका लेखा विभाग

वरिल विषयान्वये सादर करण्यांत येते की,अहमदनगर महानगरपालिकेला सन १३-१४ व १४-१५ चा लेखा परिक्षण अहवालमा.उपसंचालक(मनपा लेप)विभाग-३ स्थानिक निधी लेखापरिक्षा,औरंगाबाद यांचेकडूनजा.क्र.स्था/१८/ब/अहवाल/मनपा/ले.प.अ./२०१३-२०१४व२०१४-१५/४८८दि.२७/०६/१६व२०१४-१५चाजा.क्र.स्था /१८/ब/अहवाल/अहमदनगर मनपा/ले.प.अ/२०१४-१५/८९६ दि.२२/११/१६ वअन्वये इकडेस प्राप्त झालेला आहे.

विषयांकीत अहवाल अखेर मंजूरीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०७-अ अन्वये मा.स्थायी समितीपुढे ठेवून मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

मा.स्थायी समितीतील चर्चेअंती सन १३-१४ व १४-१५ च्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेदांचे संबंधीत विभागास वितरण करण्यात येईल.त्यानंतर परिपुर्ण,स्वयंस्पष्ट अभिप्रायासह एकत्रित अनुपालन अहवाल तयार करून परिच्छेद निकाली काढण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सबब विषयांकीत अहवाल मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यासाठी मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त अ प्रमाणे मा.स्थायी समितीकडे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे स्थानिक निधी लेखापरिक्षण सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ चा लेखा परिक्षण अहवाल मा.स्थायी समितीपुढे सादर बाबतचा विषय आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिलीप सातपुते :-सन २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखा परिक्षण अहवाला बाबतची माहिती सांगा.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- सन २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखा परिक्षण अहवाल तात्कालीन लेखापरिक्षक यांनी केले आहे.मा.स्थायी समिती समोर सदरचा अहवाल अवलोकनार्थ पाठविला आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सन १३-१४ व १४-१५ चा लेखा परिक्षण अहवाल अवलोकनार्थ ठेवण्यात आले आहे.यात मनपातील कारभारावर व तसेच आर्थिक अनियमीततेबाबत गंभीर आक्षेप घेण्यात आले आहे.या बाबतची चर्चा व लेखापरिक्षण अहवालाचे पहाणी करणे करीता वेळ लागेल.उदयापर्यत सभा स्थगीत करण्यात यावी.

मा.श्री.दिलीप सातपुते :- या अहवालातील आर्थिक अनियमीतता व लाखो रूपयांची वसूल पात्र रक्कमे बाबत सखोल चर्चा करण्या करीता वेळ लागाणार असल्याने तसेच लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती देण्यात आलेल्या नाही.त्यामुळे उदया दुपारी १ वा.पर्यत या लेखापरिक्षणाच्या विषया करीता सभा स्थगीत करण्यात यावी व आजच सर्व सदस्यांना या अहवालाच्या प्रती देण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब :- सन १३-१४ व १४-१५ चा लेखा परिक्षण अहवाल अवलोकनार्थ ठेवण्यात आले आहे.यात मनपातील कारभारावर व तसेच आर्थिक अनियमीततेबाबत गंभीर आक्षेप घेण्यात आले आहे. लाखो रूपयांची वसूल पात्र रक्कमे बाबत सखोल चर्चा करण्या करीता वेळ लागणार असल्याने तसेच लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती देण्यात आलेल्या नाही.त्यामुळे मा.सदस्यांच्या मागणी नुसार सभा उदया दुपारी १ वा.पर्यत लेखापरिक्षणाच्या विषया करीता सभा स्थगीत करण्यात येत आहे.आजच सर्व सदस्यांना लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती देण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब :- **दिनांक १०/०४/२०१७ रोजी विषय क्रमांक ८ लेखापरिक्षण अहवाल अवलोकन करणे करिता स्थागित केलेला सभा आज दिनांक ११/०४/२०१७ रोजी सुरू करण्यात यावी.**

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मा.सभापती साहेब मा.आयुक्तांना मिटींगला बोलवा.मा.आयुक्त हे संपर्ण शहराच्या कॉर्डीनेटर म्हणून काम पहातात.चर्चा करतांना मा.आयुक्त पाहिजे.ऑडीट मध्ये वसुलपात्र रकमेबाबत काय ?गंभीर स्वरूपाचा विषय आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्टसभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिलीप सातपुते :- स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाच्या संचलकाकडून मनपाच्या कारभाराची सखोल तपासणी करण्यात आली असतांना काल तुम्ही सभागृहात सदरचे लेखापरिक्षण तत्कालीन लेखापरिक्षकांनी केल्याचे सांगीतले.चुकीची माहिती देवून समिती सदस्यांची दिशाभुल करता का? हा विषय ऑफिस रिपोर्ट मध्ये मा.स्थायी समितीच्या मंजूरी घेणे आवश्यक आहे असे नमुद केले आहे.व आपण सांगताकी अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- ऑफिस रिपोर्ट मध्ये चूक झालेली असून हा विषय अवलोकनार्थ सादर आहे.

मा.सभापती साहेब :- लेखापरिक्षणातील आक्षेप व वसूल पात्र रक्कमांबाबत क्रमवार वाचन करण्यात यावे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-

१) लेखा समितीने सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात अर्थसंकल्पात जमेची बाजू ३९० कोटी ५लाख ४३ हजार गृहीत धरण्यात आली.प्रत्यक्षात २१५ कोटी ५२ लाख रूपयांचा महसूल जमा करता आला एकुध खर्चाची रक्कम ३९७ कोटी ६४ लाख रूपये गृहीत धरण्यात आले होते.त्यातील खर्च २०३ कोटी ८४ लाख रूपये झाल्याचे स्पष्ट होत आहे.त्यामुळे अंदाजपत्रक वास्तवाला धरून नाही.महसूली जमा बाजूला ८५ कोटी ५७ लाख ५१ हजार २४८ कोटी रूपयांची तुट दिसते.त्यामुळे भविष्यात महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यावर भर दयावा लागेल असा आक्षेप घेण्यात आला आहे.

२) महानगरपालिकेचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने नाहीत.

३) फेज -२ पाणीयोजनेत सहा कोटींचा गैरकारभार

४) घरकुल योजनेतील २३७ लाभार्थीची वर्गणी भरून घेण्यात आली नाही.

मा.सभापती साहेब :- घरकुल योजनेतील लाभार्थीना विद्युत व्यवस्था नसल्याने तेथील लाभार्थ्यानी माझ्याकडे तक्रार केली आहे.

विदयुत विभाग श्री.सावळे :- इलेक्टीक डी.पी.बसवावी लागेल या करीताचा खर्च एम.एस.सी.बी.कडे रक्कम वर्ग करावी लागेल.या करीता पत्रव्यवहार केला असून हा विषय लवकरच मार्गी लागेल.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र.१ मध्ये एक रस्त्याचे ६ वर्कऑर्डर दिल्या तो रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात आहे का? रस्त्याच्या कामाचे तुकडे करून कामे चालली आहेत.या प्रकरणांवर सर्व अधिका-यांच्या सहया असतात.या प्रकरणांच्या सर्व फाईल्स आणून सभागृहामध्ये वाचनू दाखवा.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- सर्व कामे वेगवेगळया निधी मधून प्रस्तावित केली आहेत.

मा.श्री.दिलीप सातपुते :- या विषयाचा ऑफिस रिपोर्ट कोणी तयार केला आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- अर्थ विभागाने हा ऑफिस रिपोर्ट तयार केला आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १०७(अ) नुसार स्थानिक निधी लेखापरिक्षण झाले.त्यात ज्या त्रुटी निघाल्या त्यावर मा.आयुक्तांनी कार्यवाही करावयाची आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- काही आक्षेपांचे उत्तर समाधानकारक आल्याने ते आक्षेप वगळयात आले आहे.

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- सन २०१३-१४ व सन २०१४-१५ चा अहवाल प्राप्त झाल्यानंतर जे आक्षेप आहे ते आपण प्रत्येक विभागाला पाठवितो.प्रत्येक विभाग त्या आक्षेप नुसार पुर्तता अहवाल पाठवितो.त्याला ३ महिन्यांची मुदत असते.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कलम १०७(अ) वाचून दाखवा.

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- स्थायी समिती सभेपुढे ठेवायचे आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- बुरूडगांव भाजी मार्केट चे ६ कोटी ६५ लाखचा ठापका आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- १३ व्या वित्त आयोगाच्या अनुषंगाने ,पहिले पान.

मा.सभापती साहेब :- ५ नंबरचा मुद्दा वाचून दाखवा.

त्यानुसार ५ क्र.मुद्दा वाचून दाखविण्यात आला.

इले.सुपरवायझार श्री.सावळे :- या कामाचे पेमेंट केले आहे.बिलाचे गठ्ठे दाखविण्याचे राहिले आहे.नंतर दाखविण्यात येईल. ऑडीट चालू असतांना बिलाच्या फाईल्स सापडत नव्हत्या.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील लाईट चे बिल कमर्शियल रेटने येते.येथे आपण वैदयकिय सेवा देता.कमर्शियल रेटने बिल येण्याचे काही करण नाही.तुम्ही अर्जदेवून बिल कमी करणेबाबतची कार्यवाही करणे आवश्यक होते.सर्व इले.विभागाचे ऑडीट करणे आवश्यक आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आपल्या कडील घरपट्टी टॅक्स च्या संदर्भात आपण कोर्टा मध्ये ९९% केसेस हारतो.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- कोर्टात कोणी अधिकारी हजर राहिला नसेल तर कारवाई करण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- बंधकाम विभागाती फाईल्स आणल्या असतील तर वाचून दाखवा.

कनिष्ठ अभियंता श्री. निंबाळकर :- १.भिस्तबाग चौक ते गजराज फॅक्टरी कॉक्रीटीकरण करणे, रू.२३ लाख चे काम आहे.१७० मिटर बी.आर.जी.एफ.मधील काम असून जा.क्र.१३४ दि.१८/६/२०१६ नुसार वर्क ऑर्डर देण्यात आली आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- केडगांव नळ कनेक्शनचे पैसे लोकांनी भरले ते खात्यात पडून आहेत.ते काम कधी पुर्ण करणार.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- ठेकेदाराचे बिल पेंडींग असल्याने सध्या काम बंद आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एल.ई.डी.लाईट बाबत माहिती सांगा

इले. विभाग श्री.सावळे :- शहरामध्ये ३ कोटी ३० लाखांचे दिवे बसविण्यात आले आहे.त्या करीताचे टईमर मे.अमित इले.औरंगाबाद यांनी इले.विभागात आणून ठेवले आहे.त्यांचे बील रूपये ३ कोटी ५० लाख अदा केले आहे.१०० टाईमर बसविण्याचे काम अदयाप बाकी आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- त्याला वर्कऑर्डर केव्हा दिली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एल.ई.डी.लाईट बाबत माहिती सांगा

इले. विभाग श्री.सावळे :- सन २०१३ मध्ये वर्कऑर्डर दिलेली आहे.

मा.सभापती साहेब :- आपण टाईमर कशासाठी बसविता.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एल.ई.डी.लाईट बाबत माहिती सांगा

इले. विभाग श्री.सावळे :- लाईट बिलामध्ये जवळपास २० % बचेत होते.टाईमर बसविण्यासाठी त्याला नोटीसा दिल्या आहेत.त्याच्या बिलातील २० ते २५ % अनामत रक्कम राखून ठेवली आहे.

मा.श्री.बोराटे साहेब :- स्थायी समितीमध्ये या विषयावर किती वेळा चर्चा झाली.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एल.ई.डी.लाईट बाबत माहिती सांगा

इले. विभाग श्री.सावळे :-टाईमर बसविण्याचे काम हे ठेकेदाराचे आहे.३ ते ४ वेळा या विषयावर चर्चाझाली आहे.त्याला आपण नोटीसा दिल्या आहेत.

मा.बाळासाहेब बोराटे :- त्या ठेकेदाराने महानगरपालिकेमध्ये टाईमर आणून ठेवले आहे.आपले मनपाचे गॅरेज म्हणजे गोडावून आहे का.त्याला काम करणे करीता मुदत आहे कि नाही.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- त्या ठेकेदाराला शेवटी ७ दिवसांची नोटीस देवून संधी दया.काम पुर्ण करून घ्या.

मा.बाळासाहेब बोराटे :- ठेकेदाराला जी नोटीस दिली त्याची एक प्रत आम्हाला देण्यात यावी.

इले. विभाग श्री.सावळे :- तुम्हाला प्रत दिली जाईल.

मा.सभापती साहेब :- लेखापरिक्षण अहवाल सन २०१४-१५ चे क्रमनिहाय वाचन करा.लाईट बिलात जी रक्कम बचत होईल त्याच्या २५ ते ३० टक्याने पैसे दयायचे या बाबत त्वरीत कार्यवाही करा.मुद्दा क्र.१४ वाचन करा.

मु.ले.अ. श्री.झिरपे :- अतिक्रमण विभागातील वित्तीय अनियमतेबाबत या मुद्दयाचे वाचन करण्यात आले.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- दि.१/१/१५ पासुन १ महिना अतिक्रमण हटाव मोहिम राबविली होती.तेव्हा अडगळीच्या ठिकाणची वाहन उचलून आणली होती त्याकरीता आपण दिवसभरासाठी भाडयाने क्रेन घेतली होती.राबविण्यात आलेल्या मोहिमेची व्हिडीओ शुटींग केली जाते.लेखापरीक्षकांना आम्ही सर्व रेकॉर्ड दाखविण्यात आले. त्यांनी आक्षेप तसाच ठेवला आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नगारोत्थान,बी.आर.जी.एफ.या मधील कामांचे लेखापरिक्षण होते का?

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- हो सर्व कामांचे ऑडीट होते.

मा.सभापती साहेब :- सिना नदी साफसफाई कामा बाबतचा मुद्दा क्र.१५ वाचा.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मुद्दा क्र.१५ चे वाचन.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- मा.लेखापरिक्षकांना आम्ही सर्व फाईल्स व रोकॉर्ड दाखविण्यात आले होते.त्यांनी आक्षेप घेतला आहे.आम्ही त्यांना रितसर उचल दिली आहे.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- २२ चे वाचन

मा.सभापती साहेब :- भोसले साहेब केडगांव गाळे वसुलपात्र रक्कमेबाबत सांगा.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- यावर्षी भाडे वसूल केले आहे.लोक जुन्या दराने पैसे भरतात.नविन दराने बाकी आहे.४ गाळयांचे पैसे अदयाप बाकी आहेत.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- मुद्दा क्र.२५ चे वाचन

मा.सभापती साहेब :- निकम साहेब वसुल पात्र रक्कमे बाबतची माहिती सांगा.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- आक्षेप आदयाप आमच्याकडे आलेले नाहीत.आल्यानंतर आम्ही ऑडीट अर्थसमास आक्षेपांची पुर्तता करण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- सध्या ८ ते १० दिवसांपासून १ सुध्दा बस चालू नाही.

मा.उपयुक्त श्री.बेहेरे :- आज पाईपलाईन रोडला बस चालू होती.

मा.सभापती साहेब :- बसचालक ठेकेदाराकडे लक्ष ठेवा रोज कीती बसेस चालविल्या जातात.

मेकॅनिकल इंजी श्री.निकम :- बसचालक ठेकेदाराची सेवा व्यवस्थीत नसल्याबाबत आम्ही लेखी कार्यवाही करून रिपोर्ट पुटअप केला आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मुद्दा क्र.२८ पान क्र.५६ वाचन. हे ऑडीट प्यारे संदर्भ टाकून वसुलपात्र रक्कम क्लीअर करून घ्या.

मा.सभापती साहेब :- श्री.झीरपे साहेब ऑडीट पॉईट बाबत सर्व संबंधीत डिपार्टमेंटला झेरॉक्स प्रत पाठवून दया व ८ दिवसांमध्ये पुर्तता करायला सांगा.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मुद्दा क्र.३० वाचन, मुद्दा क्र.४१ वाचन, मुद्दा क्र.४६ वाचन,

मा.सभापती साहेब :- हा विषय कोणत्या विभागाचा आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- प्रकल्प विभागाचा असून हा विभाग श्री.मेहेत्रे यांचा आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- श्री.मेहेत्रे रजेवर गेले असून त्यांचा चार्च पारखेंकडे दिला होता.परंतु श्री.पारखे सुध्दा मेडीकल रजेवर गेले आहेत.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मुद्दा क्र.६१ चे वाचन

मा.सभापती साहेब :- मोबाईट टॉवर पासुन उत्पन्न हे पैसे वसुली करीता प्रयत्न करा.

म मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मुद्दा क्र.६३ वाचन.

मा.सभापती साहेब :- बॉम्बे नर्सीक ॲक्ट नुसार जी नोंदणी करण्यात येते त्याची माहिती देण्यात यावी.हॉस्पीटला पार्कीग व्यवस्थानाही,ब-याच हॉस्पीटलने कंम्पीशन घेतलेले नाही.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- सर्व्हे केला आहे.

मा.सभापती साहेब :- पार्कीग मध्ये बांधकाम केलेले आहे.त्याचे आपण काय करीता.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- पार्कीग मध्ये बांधकाम केले असेल तर नोटीस देवून काढले नाही तर पाडण्यात येते.

मा.सभापती साहेब :- ब-याच पार्कीग मध्ये बांधकाम झाले आहे.कमीत कमी त्याला आकारणी करून घरपट्टीची आकारणी करण्यात यावी.कचराडेपो मध्ये मेडीकल कचरा डिझॉल्ट करणा-या संस्थेचा करार केला होता.त्या संस्थेमार्फत त्यांच्या खर्चाने मशिनरी बसविल्या आहेत.त्यांचा करार एक वर्ष बाकी असून त्यांचे मुदतवाढ मिळणे बाबत पत्र प्राप्त झाले आहे.त्या संस्थेस पुढील १० वर्ष मुदत वाढ देण्यात यावी.मोकाट कुत्र्यांबाबत मा.श्रीमती मेनका गांधी यांची एक संस्था असून या संस्थेमार्फत मोकाट कुत्र्यांचे निंबीजीकरणे करण्यात येते.त्या संस्थेशी संपर्क साधुन या संस्थेस पिंपळगांव माळवी येथे जागा उपलब्ध करून दयावी.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- मुद्दा क्र.९३ पान नं १६२ वाचन.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मधील सन २०१३-१४ व २०१४-१५ लेखा परिक्षण अहवाल स्थायी समिती ने अवलोकन केला असून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सन २०१३-१४ व २०१४-१५ लेखा परिक्षण अहवाल स्थायी समिती ने अवलोकन केला असून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सभागृहात सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार आपल्या महानगरपालिकेवर इतर आजूबाजूच्या महानगरपालिके एवढे कर्ज नाही.आपण महानगरपालिकेच्या जिवावर कर्मचारी ,ठकेदार असतील.आमचे काही गोष्टींवर आक्षेप आहेत.आपल्या महानगरपलिकेची आर्थिक परिस्थीती चांगली व्हायला पाहिजे.आक्षेपांचे चांगले व्यवस्थीत उत्तरे दयावे.कारण हा रिपोर्ट महाराष्ट्र शासनाकडे जाणार आहे.मा.आयुक्तांचे काम आहे की,महानगरपालिकेचा कारभार कशा पध्दतीने चालू आहे.मा.आयुक्तांनी जबाबदारी स्विकारून काम करावे.नगरशहरात आपल्या महानगरपालिकेला काहीही होणार नाही.विकास कामाचा वेग वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्न करू.सन २०१३-१४ व २०१४-१५ लेखा परिक्षण अहवाल स्थायी समिती ने अवलोकन केला असून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :-** १) सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार भिस्तबाग चौक ते गजराज फॅक्टरी या एकाच रस्त्याचे कामाचे तुकडे पाडून तीन स्वतंत्र्य निवीदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.त्यातील एका रस्त्याचे काम अर्धवट असूनही पुर्ण रक्कमेचे बील अदा करण्यात आले आहे.त्यातील जी जागा ताब्यातच नाही तीचीही निविदा काढण्यात आली आहे.तसेच जे काम पहिल्या निविदेतुन झाले त्याच कामाची नावे बदलून निविदा काढण्यात आली आहे.या सर्व बाबींचा विचार करता या तीन निविदांची व झालेले काम व अदा करण्यात आलेली बीले यांची सार्व.बांधकाम विभाग,कार्यकारी अभियंता यांचे मार्फत चौकशी करून अहवाल तात्काळ सादर करण्यात यावा.

२) अ.नगर मनपाचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे साठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल ) या पदावर श्री.राहुल सदाशिव गिते व श्री.प्रदीप सदाशिव ढगे दोन दिवसांचा तांत्रीक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर कारारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

३) सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन २०१३-२०१४या व सन २०१४-२०१५ चा उप संचालक (मनपा) विभाग -३ स्थानिक निधी लेखापरिक्षण,औरंगाबाद यांचे लेखापरिक्षण अहवालाबाबत मा.सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

**अ)** उप संचालक (मनपा) विभाग -३ स्थानिक निधी लेखापरिक्षण,औरंगाबाद यांचे लेखापरिक्षण अहवाला मध्ये नमुद केल्या नुसार वसुल पात्र रकमेवरील आक्षेपांच्या वसुली बाबतची संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करावी.

**ब)** उप संचालक (मनपा) विभाग -३ स्थानिक निधी लेखापरिक्षण,औरंगाबाद यांचे लेखापरिक्षण अहवालातील आक्षेप आयुक्त यांनी मुख्य लेखा अधिका-यामार्फत सर्व संबंधीत विभाग प्रमुखांकडून प्राप्त पुर्ततेसह करून वेळोवेळी त्या त्या लेखा परीक्षण प्राधिका-यांकडे सादर करावीत.

**क)** उप संचालक (मनपा) विभाग -३ स्थानिक निधी लेखापरिक्षण,औरंगाबाद यांचे लेखापरिक्षण अहवालाबाबत यांच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक लेख्यावरील अहवाल व सन २०१४-२०१५ च्या अहवालातील मुद्यांबाबत आयुक्त यांनी संबंधीत विभाग प्रमुखांकडून अनुपालन अहवाल मागवून मुख्य लेखा परिक्षकास सादर करावे. मुख्य लेखा परिक्षकांनी अनुपालन अहवाल मा.उपसंचालक (मनपा) विभाग-३ स्थानिक निधी लेखापरिक्षण , औरंगाबाद यांना सादर करावा. केलेल्या कार्यवाहीचा "ॲक्शन टेकन रिपोर्ट" पुढील स्थायी समितीस सादर करावा.

**ड)** सदरचा लेखापरिक्षण अहवाल महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम १०७ अ नुसार मा.महासभेपुढे सादर करण्यात यावा.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका